पोचदेय नोंदणीकृत डाकेने

क्र. एलआरएफ-३१८८/२६१७८/प्रकरण-५५५१/ग-६.

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १ फेब्रुवारी, १९८८.

विषय : जमीन- धुळे
मौजे नांदरखे ता. नंदुरबार
ग.नं. १२० मधील ३.९५ हेक्टर
जमीन इंदिरा महिला सेवा सोसायटी
या संस्थेस आश्रमशाळेसाठी मंजूर
करणेबाबत.

ज्ञापन :

जिल्हाधिकारी, धुळे यांना त्यांच्या विभागीय आयुक्तांमार्फत पाठविलेल्या वरील विषयाच्या क्रमांक म/कक्ष-२/ जमीन[२] १५५१५/८८ दिनांक १५ जानेवारी १९८७ च्या पत्राच्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, "इंदिरा महिला सेवा सोसायटी" या संस्थेस मौजे नांदरखे ता. नंदुरबार जिल्हा धुळे येथील ग.नं. १२० मधील ३.९५ हेक्टर [ तीन हेक्टर पंच्याण्णव आर ] जमीन आश्रमशाळेसाठी [ शाळेची इमारत व क्रीडांगण] त्यापैकी शाळेच्या इमारतीसाठी लागणारे क्षेत्र महाराष्ट्र जमीन महसूल [ सरकारी जमिनीची विल्हेवाट] नियम, १९७१ मधील नियम ५ व ६ अन्वये भोगाधिकार मुल्यरहित व सारामाफीने आणि शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक एलआरएफ-१०८३/ ७११३४/सीआर-३४७८/ग-६, दिनांक ८/२/१९८३ मधील परिच्छेद १० व १२ मध्ये उल्लेखिलेल्या शर्ती व अटींवर व क्रीडांगणासाठी लागणारे क्षेत्र उपरोक्त नियमातील नियम ७ अनुसार प्रतिवर्षी नाममात्र भाडे रु.१/- आकारून १५ वर्षांच्या भाडेपट्ट्याने उक्त परिपत्रकातील परिच्छेद ११ मधील अटींवर व "आश्रमशाळा" या समाजकल्याण विभागाच्या योजनेच्या संदर्भात त्या विभागाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटींवर देण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. जिल्हाधिकारी धुळे यांनी प्रश्नांकित जमीन "खळवाड" मधून वगळण्याची रीतसर कार्यवाही करावी व त्यानंतर जमीन मंजुरीचे आदेश निर्गमित करावेत.

कृ.मा.पहा---

३. सोबत कागदपत्रांची एक संचिका परत करण्यात येत आहे.

४. हे आदेश समाज कल्याण विभाग यांच्या सहमतीने व शासन वित्त विभाग क्रमांक ओडीओ-१९७७/१९८/७९/एफआरडी-९, दिनांक ३०/७/१९७७ अन्वये या विभागास असलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ दि. शा. मुळे. ]

सहाय्यक सचिव,

महसूल व वन विभाग.

प्रति,

जिल्हाधिकारी धुळे.

[ कागदपत्रांच्या एका संचिकेसह ]

प्रत माहितीसाठी सविनय अग्रेषित : –

१] आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.

२] जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३] उपसंचालक, भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक.

४] महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई.

५] महालेखापाल-२, महाराष्ट्र, नागपूर.

६] महालेखापाल-१, [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र, मुंबई.

७] महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र, नागपूर.

८] वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

९] समाज कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

१०] कार्यासनाच्या निवड नस्तीसाठी.

चेअरमन

इंदिरा महीला सेवा संस्था

...मानंद कालनी नंदुरबार ४२५४१.

दुसोगांवी १२८८.